28-02-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/27/2025 10:40 PM Page 1



निवडक



## मालपेतील तिहेरी अपघातात दुचाकीचालक गंभीर जखमी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २७ :** मालपे पेडणे राष्ट्रीय महामार्ग ६६वर गुरुवारी पहाटे साडेचार ते पावणे पाचच्या दरम्यान टाटा कंटेनर एमएच४३वाय ४६०३ व टाटा टिप्पर एमएच ०९ यू ६९१२ आणि यामा मोटरसायकल एमएच ०९ यू ६९१२ या तीन वाहनांमध्ये अपघात होऊन कोल्हापूर येथील राजकिरण कांबळे हा दुचाकीचालक गंभीर जखमी झाला. त्याला म्हापसा जिल्हा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले असून त्यांच्यावर तेथे उपचार सुरू आहेत. या अपघातात तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. राष्ट्रीय महामार्ग ६६ हा अत्यंत धोकादायक स्थिती असून मालपे जंक्शन या ठिकाणी नवीन बायपास रस्ता करण्याचे काम एम व्ही आर कंपनीने घेतलेले आहे. कोल्हापूर येथून यामाहा मोटरसायकलने कोल्हापूर मार्गे पेडणे येणारे राजकिरण कांबळे व त्याच्या मागे बसलेले सचिन यादव आपल्या वाहनाने रस्ता उतरणीवर टाटा कंटेनर आणि टाटा टिप्पर या दोन्ही वाहनांची धडक मोटरसायकलला लागल्यामुळे मोटरसायकल चालक राजकिरण हा जखमी झाला. त्याला तातडीने म्हापसा जिल्हा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले. पुढील तपास पेडणे पोलिस निरीक्षक सचिन लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत पार्सेकर करीत आहेत.

# साळ नदीचे झाले गटार; त्वरित कारवाईची मागणी

### नदीत थेट सांडपाणी सोडण्याच्या घटनांत वाढ | दिवसेंदिवस प्रदूषणाचा प्रश्न अतिशय गंभीर

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २७ :** साळ नदीत थेट सांडपाणी सोडण्याच्या घटनांत प्रचंड प्रमाणात वाढ झाल्यामुळे दक्षिण गोव्याची अस्मिता असलेली साळ नदी आता गटार झाली असल्याचे जागोजागी दिसून येत आहे. नदीतील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक आणि पर्यावरण प्रेमींनी चिंता व्यक्त केली असून, संबंधित प्रशासनाने त्वरित उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे.

नदीत मोठ्या प्रमाणावर सांडपाणी आणि कचरा टाकला जात असल्यामुळे तिची स्वच्छता धोक्यात आली आहे. स्थानिक गृहनिर्माण संस्था तसेच हॉटेल्समधून प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नदीत सोडले जात आहे, कारण अनेक आस्थापनांकडे सांडपाणी व्यवस्थापनासाठी आवश्यक यंत्रणा उपलब्ध नाही. नागरिकांच्या मते, शासनाने बांधकाम प्रकल्पांना सांडपाणी प्रक्रिया सुविधा पूर्ण करण्याच्या अटीशिवाय परवानगी दिली असून, यामुळे नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.

याशिवाय, मडगावमधील घाऊक मासळी बाजारातील विक्रेते मोठ्या प्रमाणावर थर्मोकोलचे बॉक्स नदीत टाकताना दिसत आहेत. यामुळे केवळ नदीचे सौंदर्य नष्ट होत नाही, तर जलस्त्रोताच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहेत. तसेच, काही ठिकाणी नद्यांकाठच्या पाईप्समधून प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नदीत मिसळत असल्याचे निदर्शनास आले आहे.

स्थानिक रहिवासी विवेक नाईक यांनी या वाढत्या प्रदूषणाबाबत संताप व्यक्त केला. साळ नदी ही साष्टी उपखंडाची जीवनवाहिनी आहे. मात्र, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी प्रदूषण रोखण्यात अपयशी ठरत आहेत. सध्या नदी गटारात परिवर्तित झाली असून, सांडपाणी थेट तिच्यात मिसळले जात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

बाणावली येथील रहिवासी संतान परेरा यांनी भूतकाळातील आठवणी सांगत नदीची झालेली दयनीय अवस्था दर्शवली. पूर्वी ही नदी स्वच्छ होती, आणि स्थानिकांसाठी मासेमारी हा मुख्य उदरनिर्वाहाचा स्त्रोत होता. मात्र, आजच्या घडीला कोणतीही प्रभावी स्वच्छता मोहिम न राबवता नदीचा ऱ्हास होत आहे. प्रशासनाने यावर तातडीने कठोर पावले उचलली पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

साळ नदीतील वाढते प्रदूषण ही स्थानिक पर्यावरण आणि नागरिकांच्या जीवनावर गंभीर परिणाम करणारी समस्या असून, त्वरित उपाययोजना न केल्यास भविष्यात जलस्त्रोताच्या ऱ्हासासोबतच जैवविविधतेवरही मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. स्थानिक प्रशासनाने जबाबदारी स्वीकारत कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



# सांडपाणी निचऱ्यामुळे आरोग्य धोक्यात

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २७ :** शहरातील तिस्क फोंडा परिसरात पुन्हा एकदा सांडपाणी (मानवी मलमूत्र) रस्त्यावर ओसंडून वाहत असल्याने स्थानिक रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या समस्येमुळे परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोका निर्माण झाला आहे.

फोंडा नगरपरिषदेने यापूर्वी अनेकदा सूचना देऊनही सांडपाणी जोडणी प्रक्रियेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची माहिती मिळत आहे. पीएमसीकडून वारंवार इशारे देऊनही काही निवासी इमारती सांडपाणी व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

स्थानिक रहिवासी किसन नाईक यांनी सांगितले की, फोंड्यात १५ एमएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यरत असतानाही अनेक ठिकाणी सांडपाणी रस्त्यावर वाहताना दिसत आहे. जर या समस्येवर तातडीने उपाययोजना न केल्या, तर डेंग्यू व इतर साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. या परिस्थितीस जबाबदार कोण? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

पीएमसीने यापूर्वीच तिस्क फोंडा येथील काही निवासी इमारतींना सांडपाणी जोडणी घेण्याचे आदेश दिले होते. परंतु, संबंधित इमारतींनी हे आदेश पाळले नाहीत, त्यामुळे आता परिसरातील इतर भागातही ही समस्या निर्माण झाली आहे.

नगराध्यक्ष आनंद नाईक यांनी यासंदर्भात नागरिकांना आवाहन करत सांगितले की, फोंडा येथील सर्व निवासी इमारती आणि सोसायट्यांनी लवकरात लवकर सांडपाणी जोडणी घ्यावी. अन्यथा, पालिकेला कठोर पावले उचलावी लागतील, ज्यामध्ये पाणीपुरवठा खंडित करण्याचाही समावेश आहे. शहराच्या स्वच्छतेसाठी सहकार्य करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

सांडपाणी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, नागरिकांचा प्रतिसाद अद्यापही समाधानकारक नाही. मात्र, पीएमसीने १५ एमएलडी क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रियेसाठी नवीन कनेक्शन देण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि सांडपाणी व्यवस्थापनाचे नियम पाळावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील सार्वजनिक ठिकाणी सांडपाणी वाहून जाणे सहन केले जाणार नाही, त्यामुळे वेळेत सांडपाणी जोडणी घेऊन शहराची स्वच्छता राखण्यास सहकार्य करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# बाणावलीत ऑलिव्ह रिडले कासवांच्या पिल्लांना जीवदान

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २७ :** बाणावली समुद्रतकिनाऱ्यावर मच्छीमार पेले आणि त्याच्या सहकाऱ्यांनी नुकत्याच जन्मलेल्या परंतु मच्छीमारांच्या किनाऱ्यावरच्या तुटलेल्या जाळ्यात गुरफटलेल्या ऑलिव्ह रिडले कासवाच्या १० ते १२ पिल्लांना जीवदान दिले आहे

पहाटेच्या सुमारास, मच्छीमार पेले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दैनंदिन मासेमारीसाठी बाणावली किनाऱ्यावरून प्रयाण केले. मात्र, निसर्गाने त्यांच्यासमोर वेगळेच आव्हान ठेवले होते. मासेमारीला जाताना , त्यांच्या नजरेस जाळ्यात अडकलेली लहान ऑलिव्ह रिडले कासवांची पिल्ले पडली. ही पिल्ले असहाय्य अवस्थेत होती आणि भटकी कुत्री व कावळ्यांच्या हल्ल्याच्या धोक्यात होती. वेळ न दवडता, मच्छीमारांनी त्यांच्या बचावासाठी तत्काळ पुढाकार घेतला.

जाळे अतिशय घट्ट गुंतलेले होते, ज्यामुळे या नाजूक कासवांसाठी जगणे कठीण झाले होते. मात्र, मच्छीमारांनी अत्यंत दक्षतेने आणि काळजीपूर्वक त्यांना मुक्त केले. या मोहिमेतील प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता, कारण किंचित उशीरानेही कासवांचे जीव धोक्यात आले असते. मुक्त झाल्यानंतर, पिल्लांना खोल समुद्रात सोडण्यात आले, जिथे त्यांचे नैसर्गिक जीवन सुरळीत सुरू राहू शकेल. मच्छीमारांनी बोटीच्या मदतीने त्यांना सुरक्षितरित्या त्यांच्या अधिवासात परत पाठवले.

सागरी जैवविविधतेत ऑलिव्ह रिडले कासवांचे मोठे योगदान आहे. त्यांचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचे मत पर्यावरणप्रेमी आणि मच्छीमार व्यक्त करतात. उत्तर गोव्यात कासव संवर्धन मोहिमेवर भर दिला जात असताना, दक्षिण गोव्यातही अशीच मोहीम सुरू करण्याची मच्छीमारांनी मागणी केली आहे.

याशिवाय, सागरी प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठीही ते आग्रही आहेत. प्रदूषणामुळे मासेमारी व्यवसाय आणि जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. विशेषतः कोळसा हाताळणी प्रकल्पांमुळे दक्षिण गोव्याच्या किनाऱ्यांना धोका पोहोचत असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे. कोळशाचे केंद्र वाढल्यास समुद्रातील पाणी विषारी होईल आणि मासेमारीचा व्यवसाय नष्ट होईल,असा इशारा मच्छीमारांनी दिला आहे. त्यांचा हा संघर्ष फक्त कासवांच्या संवर्धनापुरता मर्यादित नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी समुद्र सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न आहे.

# विध्वंसक मासेमारी पद्धतींवर तातडीने बंदी आवश्यक : एनएफएफ

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २७ : भारत सरकारने श्रीलंकेसोबत द्विपक्षीय चर्चा त्वरित सुरू करावी आणि विध्वंसक मासेमारी पद्धतींवर कठोर बंदी घालावी, अशी मागणी राष्ट्रीय मत्स्य कामगार मंच (एनएफएफ ) चे सरचिटणीस ओलेन्सियो सिमोस यांनी केली आहे. श्रीलंकेतील आंतरराष्ट्रीय लघु–स्तरीय मत्स्यव्यवसाय कार्यशाळेत सहभागी झाल्यानंतर त्यांनी ही मागणी केली.

कोलंबोच्या मिनुवांगोडा येथे आयोजित तीन दिवसांच्या कार्यशाळेत बोलताना सिमोस यांनी भारताला संयुक्त कार्यगटात स्थानिक भागधारकांचा समावेश करण्याचे आणि तळाशी ट्रॉलिंग, जोडी ट्रॉलिंग, बुल ट्रॉलिंग व एलईडी लाईट मासेमारी यांसारख्या हानिकारक पद्धतींवर कठोर कायदे लागू करण्याचे आवाहन केले.

या कार्यशाळेत आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका, कॅरिबियन, युरोप आणि उत्तर अमेरिका येथील मत्स्य व्यवसाय समुदायाच्या नेत्यांनी जागतिक लघु–स्तरीय मासेमारीसमोरील समस्यांवर सखोल चर्चा केली.पाल्क बे, जी भारतातील तामिळनाडू आणि उत्तर श्रीलंकेला वेगळे करणारी अरुंद सामुद्रधुनी आहे; येथे सीमावर्ती मत्स्य संघर्ष गंभीर स्वरूप धारण करत आहे.

सिमोस यांनी यावर प्रकाश टाकताना सांगितले की, २०२४ मध्ये श्रीलंकेच्या नौदलाने तब्बल ५३० भारतीय बोटी जप्त केल्या असून, यावर्षी जानेवारीपासून ११९ भारतीय मच्छीमार आणि १६ जहाजे श्रीलंकेकडून ताब्यात घेण्यात आली आहेत.

पाल्क बेवरील एका विशेष पॅनेल चर्चेत जाफना जिल्हा मत्स्य सहकारी संघाचे अध्यक्ष अन्नलिंगम अन्नारसा, भारताच्या राष्ट्रीय लघु मत्स्य संघटनेचे प्रदीप चॅटर्जी, श्रीलंकेतील द हिंदू' वृत्तपत्राच्या प्रतिनिधी मीरा श्रीनिवासन आणि जाफना विद्यापीठाचे वरिष्ठ व्याख्याते डॉ. अहिलन कादिरगमर आदी मान्यवरांनी सहभाग घेतला. सिमोस यांनी भारत सरकारला संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या शाश्वत लघु–स्तरीय मत्स्यपालनासाठीच्या स्वयंसेवी मार्गदर्शक तत्त्वांची पूर्णपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. भारताने या तत्त्वांना मान्यता दिली असून, याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास लाखो भारतीय मच्छीमारांचे जीवनमान सुधारेल तसेच भारतातील पोषण सुरक्षेसाठी मासे हा महत्त्वाचा स्त्रोत ठरेल. विशेषतः, जागतिक भूक निर्देशांकात भारत १२७ देशांपैकी १०५व्या स्थानावर असल्यामुळे मच्छीमारांच्या उपजीविकेचे संरक्षण करणे आणि मासेमारीचे शाश्वत व्यवस्थापन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

इंटरनॅशनल कलेक्टिव्ह इन सपोर्ट ऑफ फिशवर्कर्स आणि फोरम फॉर स्मॉल स्केल फिशरीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत समानता, लिंग–समावेशकता, स्वावलंबन आणि शाश्वत लघु–स्तरीय मत्स्य व्यवसायासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक दृढ करण्याचा संकल्प करण्यात आला.

# केरी पेडणे पठारावर बेकायदा पॅराग्लायडिंग

### स्थानिकाविरोधात गुन्हा नोंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २७ :** केरी पेडणे पठारावर बेकायदेशीर पॅराग्लायडिंग करणाऱ्या राजू गवंडी तळवाडा पेडणे याला पर्यटक पोलिसांनी पकडून त्यांच्याकडून साहित्य जप्त केले. गेल्या महिन्यात या ठिकाणी झालेल्या पॅराग्लाइडिंग अपघातात पर्यटक युवतीचा मृत्यू झाला होता .

केरी आजोबा मंदिर पठारावर यापूर्वी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर पॅराग्लायडिंग पर्यटक करत असल्याचे चित्र दिसून येत होते. या ठिकाणी कसल्याच प्रकारच्या पॅराग्लायडिंग व्यवसायाला परवाने देऊ नयेत. यासाठी केरी ग्रामसभेमध्ये ठरावही मंजूर करण्यात आला होता. परंतु गेल्या महिन्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर पॅराग्लाइडिंग करत असताना एका पुणे येथील युवतीला जीव गमवावा लागला होता. त्यानंतर सरकारने कोस्टल पोलिसांनी धडक मोहीम उभारून कोणत्याच प्रकारचे बेकायदेशीर पॅराग्लायडिंग जे व्यवसाय करतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी पावले उचलली होती. तरीही गुरुवारी स्थानिक राजू गवंडी हा स्वतः पॅराग्लायडिंग साहित्य घेऊन केरी डोंगर पठारावर पॅराग्लायडिंग करत असल्याची तक्रार आल्यानंतर लगेच घटनास्थळी पर्यटक पोलिसांनी धाव घेऊन त्यांच्याकडून सर्व प्रकारचे साहित्य जप्त करून गुन्हा नोंदवला.

# पाचव्या शतकातील 'शिवलेले जहाज' जलप्रवासासाठी सज्ज

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. २७ :** प्राचीन भारतीय शिपबिल्डिंग तंत्रज्ञानावर आधारित 'शिवलेले जहाज' बुधवारी गोव्याच्या दिवार बेटावर जलप्रवासासाठी लॉन्च करण्यात आले. हे जहाज पाचव्या शतकातील तंत्रांचा अवलंब करून तयार करण्यात आले असून त्याच्या बांधणीत नारळाच्या फायबर शिलाई, पारंपरिक लाकडी जोडणी, काथ्याच्या दोऱ्या आणि नैसर्गिक रेझिनचा वापर करण्यात आला आहे. कापसाच्या पालांनी चालणाऱ्या या ऐतिहासिक जहाजाच्या निर्मितीचा आधार महाराष्ट्रातील अजिंठा लेण्यांमधील चित्रांवर घेतला गेला आहे.

भारतीय नौदलाच्या १५ सदस्यीय चमूसह हे जहाज २०२५ च्या अखेरीस ओमानला ऐतिहासिक प्रवासासाठी रवाना होणार आहे. हा उपक्रम भारताच्या समृद्ध सागरी वारशाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी भारतीय नौदल, सांस्कृतिक मंत्रालय आणि गोवास्थित होडी इनोव्हेशन्स (ओपीसी) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या त्रिपक्षीय करारांतर्गत राबविला जात आहे.

कर्नाटक नौदल क्षेत्राचे ध्वज अधिकारी कमांडिंग रिअर ॲडमिरल केएम रामकृष्णन यांनी या अनोख्या प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी सांगितले की, हे केवळ जहाजाचे प्रक्षेपण नसून भारतीय सागरी परंपरेचे पुनरुज्जीवन आहे. ही आपल्या पूर्वजांना श्रद्धांजली असून त्यांच्या नौकानयन कौशल्याचा सन्मान करण्याचा हा प्रयत्न आहे. नौदलाच्या माहितीनुसार, जहाजाच्या ट्रान्स–ओशियनिक प्रवासासाठी क्रूचे प्रशिक्षण कारवार येथे होणार आहे. भारतीय नौदलाचे माजी अधिकारी कॅप्टन दिलीप दोंदे (निवृत्त) हे या मोहिमेसाठी मार्गदर्शन करणार आहेत.

प्रकल्पाचे प्रमुख आणि पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य संजीव सान्याल यांनी स्पष्ट केले की, हे जहाज पूर्ण झालेले नसून त्याच्या गळती आणि संरचनात्मक अखंडतेची चाचणी घेण्यासाठी पाण्यात सोडले जात आहे. प्राचीन हल तयार करण्याचा हा एक प्रयोग आहे आणि ते कसे कार्य करते हे अजूनही आम्हाला समजून घ्यायचे आहे. त्यांनी पुढे सांगितले की, यात सुकाणू नाही, चौकोनी पाल आहेत आणि विशिष्ट प्रकारचा हल आहे. त्यामुळे जहाजाच्या संचालनासाठी अधिक प्रशिक्षणाची गरज आहे.

या प्रकल्पामागील प्रेरणा इतिहासकार संजीव सान्याल यांच्या संशोधनातून आली आहे. त्यांच्या 'द ओशन ऑफ मंथन' या पुस्तकात प्राचीन शिवलेल्या जहाजांविषयी माहिती दिली आहे.

गोव्यातील होडी इनोव्हेशन्स प्रायव्हेट लिमिटेडने हे जहाज पारंपरिक कारागीर आणि जहाजचालकांच्या मदतीने बांधले आहे. तज्ज्ञ बाबू शंकरन यांच्या मार्गदर्शनाखाली लाकडी फळ्यांना वाफेच्या पारंपरिक पद्धतीने आकार देण्यात आला आहे. या फळ्या नारळाच्या फायबरच्या दोऱ्यांनी एकमेकांना जोडल्या असून रेझिन आणि माशांच्या तेलाच्या मिश्रणाने सीलबंद करण्यात आल्या आहेत.

हे जहाज पूर्णतः लाकडापासून बनले आहे आणि त्याच्या संरचनेत महत्त्वपूर्ण नैसर्गिक घटकांचा समावेश आहे. जहाजाचा मुख्य मास्ट, मिझेन मास्ट आणि बोस्प्रिट मास्ट असून स्टीयरिंग ओअर्सद्वारे नियंत्रित केला जातो. गोव्याच्या राज्य वृक्ष 'मट्टी' पासून किल तयार करण्यात आला आहे, तर स्टेम, स्टर्न आणि बीम सागवानच्या लाकडापासून बनवले आहेत. फणसाच्या लाकडाच्या चौकटी जहाजाच्या नैसर्गिक वक्रांशी जुळण्यासाठी निवडण्यात आल्या आहेत. सांधे माशांचे तेल आणि खुंद्रसच्या मिश्रणाने सीलबंद करण्यात आले आहेत.

होडी इनोव्हेशन्सचे व्यवस्थापकीय संचालक प्रथमेश दांडेकर यांनी या प्रकल्पाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, हे जहाज भारताच्या प्राचीन जहाजबांधणी कौशल्याचा जिवंत पुरावा आहे. हे हजारो वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेल्या तंत्रज्ञानावर आधारित आहे आणि भारताच्या सागरी परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या ऐतिहासिक जहाजाच्या ओमानपर्यंतच्या प्रवासाकडे आता संपूर्ण सागरी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.